# दैनिक लोकविजय

संस्थापक : कै. पां. ग. रांजणीकर


## ठाकरेंच्या याचिकेवर सुनावणीसाठी सुप्रीम कोर्टाची तयारी

नवी दिल्ली दि.५ (वृत्तसंस्था)- महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री आणि शिवसेना सुप्रिमो उद्धव ठाकरे यांच्या याचिकेवर सुनावणी करण्यासाठी सर्वोच्च न्यायालय तयार आहे. उद्धव ठाकरे यांनी महाराष्ट्र विधानसभेचे अध्यक्ष राहुल नार्वेकर यांच्या निर्णयाला आव्हान दिले असून त्यात त्यांनी शिंदे गटालाच खरी शिवसेना म्हटले आहे.

ठाकरे गटाची बाजू मांडणारे ज्येष्ठ वकील कपिल सिब्बल यांनी सरन्यायाधीश डीवाय चंद्रचूड, न्यायमूर्ती जेबी पारडीवाला आणि न्यायमूर्ती मनोज मिश्रा यांच्या खंडपीठाला सांगितले की, हे प्रकरण सोमवारी नोंदवले जाणार होते, परंतु तसे झाले नाही. त्यावर खंडपीठाने सांगितले की, आम्ही त्यावर लक्ष घालू.

वास्तविक, शिवसेना नेते एकनाथ शिंदे यांनी जून २०२२ मध्ये पक्षाविरोधात बंडखोरी केली होती. यानंतर शिंदे यांनी भाजपसोबत राज्यात सरकार स्थापन केले आणि ते स्वतः मुख्यमंत्री झाले. यानंतर शिंदे यांनी शिवसेनेवर दावा ठोकला. शिंदे यांनी असंवैधानिकपणे सत्ता काबीज केली आणि असंवैधानिक सरकार चालवत असल्याचा आरोप ठाकरे गट करत आहे.


(वर्ष ६३ वे अंक ४६) पोस्टाचा परवाना नं. / अे / आर / ए.जी.डी. – ०७ / २०२३ छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), मंगळवार, दि.०६ फेब्रुवारी २०२४ (पाने ४) (किंमत २ रुपये)


# काँग्रेसच्या गतीने देशाच्या विकासाला शंभर वर्षे लागली असती-पंतप्रधान मोदी

मुंबई दि.५ (प्रतिनिधी)- राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी केलेल्या अभिभाषणावर आज पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी लोकसभेत विरोधकांच्या टीकेला जोरदार प्रत्युत्तर दिले. ते म्हणाले, 'आम्ही ग्रामीण भागातील गरिबांसाठी चार कोटी घरं बांधली, शहरी गरिबांसाठी ८० लाख पक्की घरे बांधली. जर काँग्रेसच्या गतीने गेलो असतो तर या विकासाला १०० वर्ष लागली असती. या कामासाठी पाच पिढ्या लागल्या असत्या. १० वर्षात ४० हजार किलोमीटर रेल्वे ट्रॅकचे इलेक्ट्रिफिकेशन झाले. जर काँग्रेसच्या वेगाने गेलो असतो तर या कामाला ८० वर्ष आणि चार पिढया लागल्या असत्या. आम्ही दहा वर्षात १७ कोटी गॅस कनेक्शन दिले, काँग्रेसच्या गतीने या कामासाठी ६० वर्ष लागले असते. तीन पिढ्या धुरात गुदमरल्या असत्या.'

पंतप्रधान मोदी पुढे म्हणाले, 'काँग्रेसच्या मानसिकतेमुळे देशाचे खूप नुकसान झाले. काँग्रेसने देशाच्या सामर्थ्यावर कधीही विश्वास ठेवला नाही. त्यांनी स्वतःला शासक मानले आणि जनतेपासून अंतर ठेवून त्यांना लहान समजले. काँग्रेसच्या देशातील नागरिकांबद्दल कसा विचार करतात याबद्दल मी बोललो तर काँग्रेसला राग येतो. १५ ऑगस्ट रोजी लाल किल्ल्यावरून तत्कालीन पंतप्रधान नेहरूंनी जे सांगितले



होते, ते पुन्हा वाचून दाखवतो.'

'भारतात अधिक मेहनत करण्याची सवय नाही. आम्ही इतके काम नाही करत, जेवढे युरोप, जपान, रशिया, अमेरिका किंवा चीनमधील लोक करतात. हे समजू नका त्यांचा समाज चमत्काराने विकसित झालेला नसून मेहनत आणि हुशारीच्या बळावर विकसित झाला आहे', म्हणजे नेहरु भारतीय नागरीकांना आळशी समजत होते. भारतीय कमी अक्कल असलेले आहेत', असे नेहरुंचे म्हणणे असल्याचे पंतप्रधान मोदी म्हणाले.

पंतप्रधान नरेंद्र मोदी म्हणाले, देशातील चार स्तंभ जेवढे मजबूत असतील तेवढ्याच गतीने देशाचा विकास होईल. देशातील स्त्रीयांची आणि तरुणांच्या शक्तीचाही राष्ट्रपतींनी उल्लेख केला आहे. कधीपर्यंत देशाचे तुकडे करणार आहात? असा सवालही मोदींनी केला. अनेकदा सकारात्मक सूचना येतात. मात्र, काँग्रेसने सर्वांना नाराज केले आहे. नेते बदललेले आहेत, मात्र टेप रेकॉर्डर तोच आहे. निवडणूकीचे वर्ष आहे, थोडी मेहनत करायला हवी होती. त्यामध्ये देखील हे नापास झाले आहेत. त्यामुळे पुढील निवडणुकीत हे प्रेक्षक म्हणून पाहायला मिळतील, असा दावाही पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केला. विरोधी पक्षाच्या स्थितीला काँग्रेसचं जबाबदार असल्याचेही मोदी म्हणाले.

मल्लिकार्जुन खरगे दुसऱ्या सभागृहात शिफ्ट झाले तर गुलाम नबी आझाद यांनी पक्ष सोडला. कोणत्या परिवाराने लोकांच्या पाठिंब्याच्या जोरावर राजकीय क्षेत्रात स्वतःला सिद्ध केलय. अशा कुटुंबाच्या घराणेशाहीला कधीच विरोध केला नाही. मात्र, काँग्रेस पक्षात एकाच कुटुंबाच्या इशारावर निर्णय घेतले जातात, त्या घराणेशाहीला आमचा विरोध आहे. राजनाथ सिंह, अमित शहा यांचा कौटुबिक असा कोणताही पक्ष नाही, असेही मोदी म्हणाले.

## ज्येष्ठ नागरिकांना मुख्यमंत्री वयोश्री योजनेतून लाभ मिळणार

मुंबई दि.५ (प्रतिनिधी)- राज्यातील २ लाख रुपये वार्षीक उत्पन्न मर्यादेत ६५ वर्षांवरील ज्येष्ठ नागरिकांना मुख्यमंत्री वयोश्री योजनेचा लाभ दिला जाणार असून पात्र लाभार्थ्यांच्या बँक खात्यात तीन हजार रुपये एकरकमी थेट लाभ देणार असल्याचा निर्णय आज मंत्रीमंडळ बैठकीत घेण्यात आला. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली आज कॅबीनेट मंत्रीमंडळाची बैठक घेण्यात आली.

हा लाभ देतांना प्रामुख्याने ज्येष्ठांमध्ये अपंगत्व, अशक्तपणा याचे निराकरण करण्यासाठी आवश्यक उपकरणे खरेदी करणे तसेच मानसिक स्वास्थ संतुलित ठेवण्यासाठी मनस्वास्थ्य केंद्रे व योगोपचार केंद्रांद्वारे प्रबोधन व प्रशिक्षण देण्यात येईल. याची अंमलबजावणी ग्रामीण भागासाठी जिल्हाधिकारी व शहरी भागांसाठी आयुक्तांमार्फत केली जाईल. यासाठी आरोग्य विभागांमार्फत ज्येष्ठ नागरिकांचे सर्वेक्षण व स्क्रिनींग करण्यात येऊन लाभार्थ्यांची तपासणी करण्यात येईल आणि पात्र लाभार्थींना तीन हजार रुपये एकरकमी थेट लाभ त्यांच्या बँक खात्यात जमा करण्यात येईल.

या योजनेसाठी ४८० कोटी रुपयांच्या खर्चास देखील या बैठकीत मान्यता देण्यात आली. राज्यात सध्या ज्येष्ठ नागरिकांची संख्या सव्वा ते दिड कोटींच्या दरम्यान आहे. त्यामध्ये अपंगत्व आणि मानसिक अस्वास्थ्याने पिडीत सुमारे १५ लाख ज्येष्ठ नागरिकांना याचा लाभ मिळेल. केंद्राची राष्ट्रीय वयोश्री योजना राज्यातील निवडक जिल्ह्यात राबवण्यात येते. मात्र 'मुख्यमंत्री वयोश्री योजना' राज्यातील सर्व जिल्ह्यात राबवण्यात येईल.

राज्यातील वाढत्या नागरीकरणाचा वेग लक्षात घेता शहरातील नागरीकांना नागरी पायाभूत सुविधा वेळेत उपलब्ध करुन देण्यासाठी नगरोत्थान महाभियानास मार्च, २०३० पर्यंत मुदतवाढ देण्यास व अभियानाची व्याप्ती वाढवण्यास मान्यता देण्यात आली.

यामध्ये सर्व नगरपरिषद, नगरपंचायत व 'ड' वर्ग महानगरपालिका यांच्याशिवाय 'अ', 'ब' व 'क' वर्ग महानगरपालिकांचा देखील समावेश करण्यात आल्याने राज्यातील मोठ्या शहरी लोकसंख्येस याचा फायदा मिळणार आहे. या अभियानामध्ये यापूर्वी समाविष्ट असलेल्या (पान ४ वर)

## नाभिक समाजाच्या वक्तव्याचा विपर्यास नको; भुजबळांचे स्पष्टीकरण

नाशिक दि.५ (प्रतिनिधी)- अहमदनगर येथे झालेल्या ओबीसी भटक्या विमुक्त एल्गार मेळाव्यात नाभिक समाजाबद्दल केलेलं हे वक्तव्य हे एका बांधवाने त्याच्या गावातील केलेल्या तक्रारीमुळे केलेले असून हे वक्तव्य केवळ त्या गावापुरतेच मर्यादित आहे. त्यामुळे कुणीही या वक्तव्याचा विपर्यास करू नये, असे स्पष्टीकरण राज्याचे अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री छगन भुजबळ यांनी केले.

मंत्री छगन भुजबळ यांनी म्हटले आहे की, एका गावातील नाभिक समाजाच्या कार्यकर्त्याने ओबीसी आरक्षणाच्या समर्थनार्थ पोस्ट केली. त्या नाभिक समाजाच्या व्यक्तीच्या दुकानात केस कापायला जायचं नाही अशी तिथल्या मराठा समाजाने भूमिका घेतली होती अशी बहिष्काराची भाषा जर कोणी करत असेल तर नाभिक बांधवांनी सुद्धा त्यांच्यावर बहिष्कार टाका, असे अहमदनगर येथे ओबीसी भटके विमुक्त एल्गार सभेत आपण भुजबळ यांनी आवाहन केले होते. यावरून भुजबळांना विविध स्तरातून टीका केली जाऊ लागली.

## स्वाती मोहोळ यांना पुन्हा जीवे मारण्याच्या धमक्या

पुणे दि.५ (प्रतिनिधी)- शरद मोहोळ हत्या प्रकरणातील आरोपी मुन्ना पोळेकर याच्या नावाने स्वाती मोहोळ यांना पुन्हा जीवे मारण्याच्या धमक्या आल्या आहेत. सोशल मीडिया प्लॅटफॉर्मवर मुन्ना पोळेकरच्या नावाने अकाऊंट बनवत स्वाती मोहोळ यांना जीवे मारण्याची धमकी देण्यात आली आहे. स्वाती मोहोळ यांना मेसेज करुन आणि आक्षेपार्ह पोस्ट करत हा प्रकार केलाय.

मुन्ना पोळेकर हा शरद मोहोळ हत्या प्रकरणातील मुख्य आरोपी आहे. त्याच्या नावानेच या धमक्या देण्यात येत आहेत.

## पेपर फोडल्यास १० वर्षांचा होणार तुरुंगवास

नवी दिल्ली दि.५ (वृत्तसंस्था)- परीक्षांमध्ये होणारा वाढता गैरप्रकार आणि पेपर फुटीच्या वाढत्या घटनांना आळा घालण्यासाठी सरकारकडून पाऊले उचलण्यात येत आहे. आता लवकरच पेपर लीक करणाऱ्यांना आळा बसणार आहे. पेपर फोडल्यास आता कठोर शिक्षेची तरतूद करण्यासाठी सरकार प्रयत्नशील आहे. परीक्षेतील गैरप्रकारांना आळा घालण्यासाठी सरकारने संसदेत विधेयक सादर केलं आहे.

लोकसभेत आज सार्वजनिक परीक्षा (अन्याय प्रतिबंधक) विधेयक २०२४ सादर करण्यात आलं. या विधेयकानुसार पेपर लीक प्रकरणात दोषी आढळल्यास १० वर्षांचा कारावास आणि एक कोटी रुपयांच्या दंडाची तरतूद करण्यात आली आहे. तसेच, दुसऱ्याच्या जागी डमी परीक्षार्थी बनून परीक्षा दिल्यास तीन ते पाच वर्षांच्या शिक्षेची तरतूद करण्यात आली आहे.

संसदेत सोमवारी ५ फेब्रुवारीला परीक्षा अन्याय प्रतिबंधक विधेयक २०२४ लोकसभेत सादर करण्यात आलं आहे. या विधेयकामुळे परीक्षांमधील गैरप्रकाराला आळा बसेल. पेपर लीक करणे, नक्कल करणे, अशी अनेक प्रकरणे गेल्या काही दिवसांपासून समोर आली आहे. याला आता आळा बसणार आहे.

केंद्र सरकारने सोमवारी लोकसभेत पेपर फुटीबाबत सार्वजनिक परीक्षा अयोग्य माध्यम प्रतिबंध विधेयक २०२४ सादर केलं आहे. देशातील विविध राज्यांमध्ये पेपरफुटीच्या आणि कॉपीच्या घटना दिवसागणिक वाढत आहेत. अनेक राज्यांमध्ये याविरोधात कायदेही करण्यात आले आहेत, पण राष्ट्रीय पातळीवर याविरोधात कोणताही कायदा नाही. अनेक राज्यांमध्ये पेपरफुटीमुळे परीक्षा रद्द करून पुन्हा परीक्षा घ्याव्या लागल्या आहेत.

## लोकसभा निवडणुकीच्या कामात मुलांचा वापर केल्यास कारवाई होणार

### निवडणूक आयोगाकडून नियमावली जारी

नवी दिल्ली दि.५ (वृत्तसंस्था)- आगामी लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर केंद्रीय निवडणूक आयोगाने मोठा निर्णय घेतला आहे. निवडणुकीच्या संदर्भात कोणत्याही कामात लहान मुलांचा वापर न करण्याचे निर्देश आयोगाने सर्व राजकीय पक्षांना दिले आहेत. राजकीय पक्षांनी पोस्टर्स, पॅम्प्लेट वाटप, प्रचार रॅली आणि निवडणूक सभांसह कोणत्याही स्वरूपातील निवडणूक प्रचारात लहान मुलांचा वापर करू नये असं आयोगाने म्हटलं आहे. तसं आढळल्यास राजकीय पक्षांसोबत प्रशासकीय अधिकाऱ्यांवरही कारवाई करण्यात येणार असल्याचा इशाराही दिला आहे.

केंद्रीय निवडणूक आयोगाने लोकसभा निवडणुकीसंदर्भात नियमावली जाहीर केली आहे. निवडणुकीच्या कोणत्याही कामात लहान मुलांचा वापर करण्याबाबत कडक निर्देश जारी करण्यात आले आहेत. पोस्टर आणि पॅम्प्लेटमध्ये प्रचारासाठी कोणत्याही स्वरूपात लहान मुलांचा वापर करण्यास मनाई केली आहे.

## 'ते' जय श्रीराम म्हणतात, मी त्यांना हरामखोरपणा म्हणतो; उद्धव ठाकरेंची भाजपवर जहरी टीका

चिपळून दि.५ (प्रतिनिधी)- भारतीय जनता पक्षाने २०१४ मध्ये माझा पक्षप्रमुख म्हणून पाठिंबा घेतला. माझ्या सह्या घेतल्या. माझा पाठिंबा घेताना यांना मी शिवसेना प्रमुख बाळासाहेब ठाकरेंचा मुलगा आहे हे माहिती नव्हते का? तेव्हा घराणेशाहीबाबत हे बोलले नाहीत. हे त्यांचे ढोंग आणि हरामखोरपणा आहे. ते जय श्रीराम म्हणतात मी त्यांना हरामखोरपणा म्हणतो, अशी जहरी टीका ठाकरे गटाचे प्रमुख उद्धव ठाकरे यांनी केली. चिपळून येथे ठाकरे गटाची सभा पार पडली. यावेळी उद्धव ठाकरे बोलत होते.

संकट आलं तर त्याच्या छाताडावर चालून जा असं मला आजोबांनी सांगितलं होतं. संकट आलं की जे मुखवटे घातलेले कोण आणि खरे कोण? ते कळतं. सगळं देऊनही ज्यांची लाळ गळत असते ते लाळघोटे आज भाजपात गेले आहेत असंही उद्धव ठाकरे चिपळूणच्या सभेत म्हणाले.

चिपळूणमधले धरणं फोडणारे खेकडे एकत्र गेले आहेत. खेकडा तिरकाच चालणार, त्याचं काय करायचं तुम्हाला माहीत आहे. आज सोमवार आहे खेकड्याला सोडून द्या आज. अमावस्या, पौर्णिमा कधी आहे ते बघा असा टोलाही उद्धव ठाकरेंनी म्हटलं आहे. आपण सर्वोच्च न्यायालयात गेलो आहोत. न्याय मिळेल अशी अपेक्षा सर्वोच्च न्यायालयाकडून आहे. सर्वोच्च न्यायालयाच्या बरोबरीने सर्वात मोठं न्यायालय तुम्ही आहात, माझं जनता न्यायालय आहे असंही उद्धव ठाकरे म्हणाले. आज माझे हात रिकामे आहेत, तरीही तुम्ही सगळे आलात. एकही माणूस भाड्याने आणलेला नाही. सरकार आपल्या दारी म्हणत काही लोक येतात, त्यांच्या कार्यक्रमात अर्ध्या खुर्च्याही रिकाम्या असतात असे उद्धव ठाकरे यांनी म्हटले.

## जरांगेंचे १० फेब्रुवारीपासून पुन्हा आमरण उपोषण

जालना दि.५ (प्रतिनिधी)- मराठा समाजाचा अपमान होईल असं मी एकही पाऊल उचललेलं नाही. मुंबईला जाण्याच्या अगोदरही षडयंत्र रचण्यात आलं होतं. मला कसं बाजूला सारण्यात येईल, याचा कट रचला जातोय. काही लोकांना माझ्यामुळे आरक्षणाचा लाभ घेता आला नसल्याची टीका मनोज जरांगे पाटील यांनी केली.

जरांगे पाटील हे आता पुन्हा एकदा १० फेब्रुवारीपासून उपोषणाला बसणार आहेत. यावेळी माध्यमांशी बोलतांना त्यांनी मराठा आरक्षणाला केवळ विरोध केला जात आहे. आम्ही कायदा बनवून आणला हे आमचं यश नाही का? मात्र तरीदेखील अनेकजण सोशल मीडियावर अफवा पसरवत आहेत. गोरगरीबांची दिशाभूल करण्याचं काम यांच्याद्वारे केलं जात आहे. त्यांनी थेट मला भेटून माझ्याशी चर्चा करावी. मी आता केवळ त्यांच्यासाठी उपोषणाला बसलो आहे, असेही मनोज जरांगे पाटील म्हणाले.

जरांगे म्हणाले की, अनेकांना मान-सन्मान, पैसे आणि पद हवे होते. ते त्यांना मिळालेलं नसल्याने ते ही कटकारस्थाने करत आहेत. गोरगरिबांच्या लढ्याच्या विरोधात बोलत आहेत. राजकीय आणि विरोधी या दोघांची भूमिका घेणारे ही लोक आहेत. पक्षाच्या लोकांनीच यांना बोलायला सांगितलं आहे. मात्र खोटं बोलून मराठ्यांचं गोरगरीबांचं वाटोळं करू नका. त्यांना जे मिळवायचं होतं ते मिळालेलं नाही म्हणून इतराचं वाटोळं करू नका असे जरांगे यांनी म्हटले.

## झारखंडचे चंपई सरकार बहुमत चाचणीत पास

### ४७ आमदारांचा सरकारला पाठिंबा, २९ विरोधात

रांची दि.५ (वृत्तसंस्था)- झारखंडमध्ये चंपई सोरेन सरकारने विश्वासदर्शक ठराव जिंकला. ५ फेब्रुवारी रोजी दुपारी २ वाजता झालेल्या मतदानात बाजूने ४७ तर विरोधात २९ मते पडली. भाजप, झारखंड मुक्ती मोर्चा (जेएमएम) आणि एक अपक्ष यांचा प्रत्येकी एक आमदार गैरहजर राहिला. अपक्ष सरयू राय सभागृहात होते, पण मतदान केले नाही. यापूर्वी चंपई यांनी विश्वासदर्शक ठराव मांडला होता. चर्चेसाठी एक तास १० मिनिटांचा वेळ देण्यात आला होता.

२३ मिनिटांच्या भाषणात हेमंत सोरेन यांनी केंद्र सरकार आणि भाजपला जोरदार प्रत्युत्तर दिले. म्हणाले की, देशात प्रथमच मुख्यमंत्र्यांना अटक झाली. त्यात राजभवनाचा समावेश आहे असे दिसते. जमीन हडपल्याची कागदपत्रे दाखवा, मी झारखंड सोडेन, राजकारण बाजूला ठेवा.

दरम्यान, हेमंत सोरेन यांच्या याचिकेवर सोमवारीच झारखंड उच्च न्यायालयात सुनावणी झाली. ईडीचे उत्तर ९ फेब्रुवारीला हायकोर्टात दाखल केले जाणार आहे. पुढील सुनावणी १२ फेब्रुवारीला होणार आहे. अटक आणि कोठडीला आव्हान देणारी याचिका हेमंत सोरेन यांच्या वतीने हायकोर्टात दाखल करण्यात आली आहे.

## 'ही तर लोकशाहीची हत्या', चंदीगडच्या महापौर निवडणुकीवर सरन्यायाधीश डीवाय चंद्रचूड संतापले

नवी दिल्ली दि.५ (वृत्तसंस्था)- चंदीगड महापौर निवडणुकीतील गैरव्यवहारावर आज सर्वोच्च न्यायालयात सुनावणी झाली. यावेळी सरन्यायाधीश डी. वाय. चंद्रचूड यांच्या अध्यक्षतेखाली तीन न्यायाधीशांच्या खंडपीठाने या प्रकरणाची सुनावणी घेतली. यावेळी सरन्यायाधीशांना पीठासीन अधिकाऱ्यांचा व्हिडिओ दाखविण्यात आला. पीठासीन अधिकारी मतांमध्ये खाडाखोड करून छेडछाड करत असल्याचे दिसल्यानंतर सरन्यायाधीश यांनी याप्रकाराचा निषेध केला. ही सरळ सरळ लोकशाहीची हत्या असल्याची संतप्त प्रतिक्रिया सरन्यायाधीश चंद्रचूड यांनी दिली. तसेच या प्रकरणाची पुढील सुनावणी आता १२ फेब्रुवारी रोजी होणार आहे.

खंडपीठातील इतर दोन न्यायाधीश न्या. जे. बी. पार्डीवाला आणि न्या. मनोज मिश्रा यांनी निर्देश दिले की, ७ फेब्रुवारी रोजी नवनिर्वाचित नगरसेवकांची होणारी बैठक पुढचे आदेश मिळेपर्यंत पुढे ढकलण्यात यावी.

## 'ध' चा 'मा' करणाऱ्या नाटकीबाज लोकांना मी महत्त्व देत नाही

### 'शेवटची निवडणूक'वरून अजित पवारांची सारवासारव

मुंबई दि.५ (प्रतिनिधी)- बारामती येथील सभेत जनतेल संबोधित करताना अजित पवारांनी शरद पवारांवर अप्रत्यक्ष टीका केली होती. शेवटची निवडणूक आहे असं सांगून मते मागितली जातील, परंतु, त्यांच्या भावनिक मागणीला बळी पडू नका, असं आवाहन अजित पवारांनी केलं होतं. अजित पवारांच्या या वक्तव्यावरून अजित पवार आणि जितेंद्र आव्हाड यांच्यात शाब्दिक युद्ध सुरू झालं आहे. आपल्या वक्तव्याप्रकरणी अजित पवारांनी स्पष्टीकरण दिल्यानंतर आता जितेंद्र आव्हाड यांनी या स्पष्टीकरणाला प्रत्युत्तर दिलं आहे.

'उद्या जेव्हा खासदारकीच्या निवडणुका येतील. मी उमेदवार जाहीर करेन, तिथे मी उभा आहे (अजित पवार) असं समजून मतं द्या हे मी तुम्हाला सांगतो. कुणी भावनिक होतील. आमची शेवटची निवडणूक आहे म्हणतील. अमकंच आहे, तमकंच आहे म्हणतील. त्यांची शेवटची निवडणूक कधी होणार आहे माहीत नाही. पण, तुम्ही भावनिक होऊ नका अशी माझी विनंती आहे', असं अजित पवार म्हणाले होते.

अजित पवारांनी अप्रत्यक्षपणे शरद पवारांना टोला लगावल्याची चर्चा राजकीय वर्तुळात आहे. यामुळे शरद पवार गटातील नेत्यांनी याविरोधात टीका केली. 'एखाद्या माणसाच्या मृत्यूची वाट पाहणं कितपत योग्य आहे, अजित पवारांनी सर्व मर्यादा ओलांडल्या आहेत', अशी टीका जितेंद्र आव्हाडांनी केली. तसंच, अनेक नेत्यांनीही अजित पवारांवर टीकास्त्र डागलं. यावरून अजित पवारांनी त्यांची भूमिका एक्सवरून स्पष्ट केली.

'काल माझ्या म्हणण्याचा चुकीचा अर्थ काढला गेला आहे. माझं पहिल्यापासून, राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष एकत्र असल्यापासून एवढंच म्हणणं होतं की, ज्येष्ठ नेत्यांनी शारीरिक दगदगीचा विचार (पान ४ वर)

## शिवसेनेच्या मंत्र्यांनी घेतली फडणवीसांची भेट

### गणपत गायकवाडांवर शिस्तभंगाच्या कारवाईची मागणी

मुंबई दि.५ (प्रतिनिधी)- भाजप आमदार गणपत गायकवाड यांनी पोलिस ठाण्यात शिवसेनेच्या शिंदे गटाच्या नेत्यावर गोळीबार केल्यामुळे राजकारण चांगलेच तापले आहे. शिंदे गटाच्या ७ मंत्र्यांनी सोमवारी या प्रकरणी उपमुख्यमंत्री तथा गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेऊन त्यांच्यावर शिस्तभंगाची कारवाई करण्याची मागणी केली आहे. यामुळे हे प्रकरण भाजपला चांगलेच जड जाण्याचा दावा केला जात आहे.

भाजप आमदार गणपत गायकवाड यांनी उल्हास नगरच्या हिललाईन पोलिस ठाण्यात शिवसेना शिंदे गटाचे कल्याण पूर्वचे शहरप्रमुख महेश गायकवाड व त्यांचे सहकारी राहुल पाटील यांच्यावर गोळीबार केला होता. या प्रकरणी आमदार गणपत गायकवाड यांच्यासह हर्षल केणे व संदिप सरवनकर आदी ७ जणांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. गायकवाड यांनी या प्रकरणी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यावर (पान ४ वर)

# मतदार राजाला खूश करण्याचा संकल्प

केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी आपल्या कारकिर्दीतला सहावा व प्रधानमंत्री नरेंद्र मोदी सरकारच्या दुसऱ्या कार्यकाळामधील अंतरिम केंद्रीय अर्थसंकल्प संसदेत सादर केला. अंतरिम अर्थसंकल्प हा निवडणुकीपूर्वी सादर केला जातो. त्यामुळे आपल्या देशातील लोकसभा निवडणुकीचा विचार करता केंद्रीय अर्थमंत्र्यांनी सादर केलेला अंतरिम अर्थसंकल्प म्हणजे देशातील मतदार राजाला खूश करण्याचा प्रयत्न करणारा अर्थसंकल्प असे म्हणता येईल. अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांच्या कारकिर्दीतील सहावा अर्थसंकल्प आहे. त्यांनी आज माजी केंद्रीय अर्थमंत्री मोरारजी देसाई यांच्या विक्रमाशी बरोबरी केली. लोकसभा निवडणुका तोंडावर असल्यामुळे पूर्ण अर्थसंकल्प सादर न करता अंतरिम अर्थसंकल्प सादर करण्यात आला.

मागील अर्थसंकल्पात केंद्रीय अर्थमंत्र्यांनी सर्वसमावेशक विकास, शेवटच्या व्यक्तीपर्यंत पोहोचणे, पायाभूत सुविधा आणि गुंतवणूक, क्षमतांचा खऱ्या अर्थाने वापर करणे, हरित विकास, युवा शक्ती आणि आर्थिक क्षेत्र या सात उद्दिष्टांवर भर देण्यात आलेला होता. त्यालाच सप्तर्षी असे संबोधण्यात आले. त्यामुळे सन २०२२-२३ या आर्थिक वर्षाचा केंद्रीय अर्थसंकल्प हा सप्तर्षी केंद्रीय अर्थसंकल्प असे वर्णन करण्यात आलेले होते. मागील दहा वर्षांत देशात 'सबका साथ सबका विकास' हा मंत्र डोळ्यांसमोर ठेवून सरकारने काम केल्याचे केंद्रीय अर्थमंत्री सांगतात. तसेच जुलै महिन्यात आमचे सरकार पूर्ण अर्थसंकल्प सादर करेल, असे आत्मविश्वासाने बोलायला त्या विसरल्या नाहीत. सीतारामन यांनी जो अंतरिम केंद्रीय अर्थसंकल्प संसदेत सादर केला त्यातील घोषणांचा थोडक्यात आढावा घेऊ.

देशाच्या अंतरिम अर्थसंकल्पाचा अभ्यास करताना, गेली दहा वर्षे सरकारी बाबू कररचनेच्या प्रतीक्षेत होते. त्यामुळे प्रत्येक वर्षी सरकारी बाबूंचा शोष सरकारला घ्यावा लागत होता. आता मात्र रुपये अडीज लाखांवरून सात लाख रुपये वार्षिक उत्पन्न असणाऱ्या करदात्यांना कोणताही कर भरावा लागणार नाही. करदात्यांना त्यांच्या समस्या सोडविण्यासाठी अधिकाधिक सुविधा देण्यासाठी सरकार प्रयत्न करणार असल्याचे अर्थमंत्र्यांनी सांगितले. तसेच शासकीय योजनांमुळे ग्रामीण भागातील लोकांच्या उत्पन्नात वाढ झाल्याचे अर्थमंत्री सांगतात. सन २०४७ पर्यंत आपला भारत देश विकसित देश असेल. त्यासाठी देशातील गरीब महिला, युवक आणि शेतकऱ्यांसाठी सरकार काम करत आहे. प्रधानमंत्री स्वनिधी योजनेचा अनेक लोकांना लाभ झाल्याचे सांगत देशातील २५ कोटी नागरिकांसाठी विविध योजना राबविण्यात आल्या, तर ८० कोटी देशातील नागरिकांना मोफत धान्यवाटप केल्याचे त्यांनी सांगितले.

देशातील महिला सक्षमीकरणावर भर देण्यात आला. महिलांच्या सुरक्षेसाठी महत्त्वाचे पाऊल, तिहेरी तलाक हा नरेंद्र मोदी सरकारचा सर्वात मोठा निर्णय आहे. तसेच प्रधानमंत्री आवास योजनेअंतर्गत ग्रामीण भागातील ७० टक्के महिलांना घरे मिळाल्याचे सांगितले. तसेच देशातील १ कोटी महिला लखपती दीदी बनल्या असून देशातील इतर महिलांसाठी त्या प्रेरणादायी ठरल्या आहेत. आता तर लखपती दीदींचे लक्ष्य २ कोटींवरून ३ कोटी करण्यात आले असल्याचे त्यांनी म्हटले आहे. दुग्ध उत्पादनासाठी शेतकऱ्यांना नवीन योजना सुरू करणार असल्याचे सांगितले असून किसान संपदा योजनेतून ३८ लाख शेतकऱ्यांना लाभ मिळाला आहे. देशात सात नवे आयआयएम व वैद्यकीय महाविद्यालयांची स्थापना करण्यात येणार असून देशातील ९ ते १४ वर्षांच्या मुलींना सर्व्हायकल कॅन्सर रोखण्यासाठी लस दिली जाणार आहे. लोकांच्या निवाऱ्याच्या दृष्टीने प्रधानमंत्री आवास योजनेंतर्गत पुढील ५ वर्षांत ग्रामीण भागात आणखी दोन कोटी घरे बांधली जाणार असल्याची घोषणा केली आहे. एक कोटी घरांना सौरऊर्जा देण्याचे ध्येय ठेवले आहे.

विशेषत: देशातील सार्वजनिक वाहतुकीसाठी ई-वाहने उपलब्ध करून दिली जाणार आहेत. रेल्वे-सागरी मार्ग जोडण्यावरही भर दिला जाणार असल्याचे सांगितले. पर्यटन केंद्रांच्या विकासाला गती देणार असून या क्षेत्रात विदेशी गुंतवणुकीला सुद्धा चालना मिळणार आहे. यासाठी रुपये ७५ हजार कोटी रुपयांचे कर्ज बिनव्याजी देण्यात येणार आहे. पायाभूत सुविधांवर ११ टक्के अधिक खर्च केला जाणार असल्याचे सांगतात. संशोधन व विकास या क्षेत्रांत नवीन उद्योग येण्यासाठी ५० वर्षे कालावधीसाठी व्याजमुक्त अर्थसाह्य देणार असल्याचे सांगून आपले सरकार एक लाख कोटी रुपयांचा निधी तयार करणार असल्याचे सांगितले आहे. त्यामुळे केंद्रीय अर्थमंत्र्यांनी अंतरिम केंद्रीय अर्थसंकल्पात केलेल्या घोषणा देशाच्या विकासासाठी गती देणाऱ्या असल्या तरी त्या नि:पक्षपातीपणे राबविणे आवश्यक आहे. असे असले तरी अंदाजे पुढील तीन महिन्यांनंतर होणाऱ्या लोकसभेच्या निवडणुकीचा विचार करता केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी मांडलेल्या अंतरिम अर्थसंकल्पाचा अभ्यास केल्यास अंतरिम अर्थसंकल्प हा मतदारांना आकर्षित करणारा आहे. त्याचमुळे केंद्रीय अर्थमंत्री यांनी जुलै महिन्यात आमचे सरकार पूर्ण अर्थसंकल्प सादर करेल, असे अर्थसंकल्पाच्या भाषणाच्या शेवटी त्यांनी सांगितले. तोपर्यंत आता वाट बघू या...!

# अशोक सराफ यांना महाराष्ट्र भूषण पुरस्कार



**मराठीतील** रंगभूमी, चित्रपटसृष्टी, आणि टेलिव्हिजन या सर्व माध्यमातून स्वतःच्या भूमिकांचा ठसा उमटवणाऱ्या अशोक सराफ यांचा महाराष्ट्र शासनाने शासनाचा सर्वोच्च पुरस्कार ङमहाराष्ट्र भूषणङ देऊन त्यांच्या कलाक्षेत्रातील कार्याचा गौरव केला आहे.

या पुरस्काराबद्दल सर्व क्षेत्रातून त्यांचे अभिनंदन करण्यात येत असून जाणत्या कलाकारांनी त्यांचे कौतुकही केले आहे. ४ जून १९४७ या वर्षी जन्मलेल्या अशोक सराफ यांनी हिंदी, मराठी चित्रपटसृष्टी,नाटयसृष्टी त्यांच्या बहुआयामी भूमिकांनी गाजविलीआहे. विजया मेहता यांच्या हमीदाबाईची कोठी या नाटकात त्यांची भूमिका पूर्णपणे वेगळी होती आणि ती ते अतिशय समरसुन करत असत. या नाटकाच्या निमित्ताने त्यांनी महाराष्ट्र तसेच महाराष्ट्रीयन प्रेक्षक असलेल्या भारतातील सर्व गावांमधून प्रवास केलेला आहे. १९८० च्या दशकात सचिन पिळगावकर, लक्ष्मीकांत बेर्डे, महेश कोठारे यांच्यासोबत अनेक धमाल विनोदी मराठी चित्रपटातून कायम लक्षात राहतील अशा पद्धतीच्या भूमिका त्यांनी केल्या आहेत.

धुमधडाका, अशी ही बनवाबनवी, गंमत जंमत, एक डाव भुताचा,ही त्यांच्या काही चित्रपटांची नावे आहेत. वयाच्या १८ व्या वर्षी ययाती आणि देवयानी या नाटकाद्वारे त्यांनी रंगभूमीवर पदार्पण केले. याव्यतिरिक्त प्रेमा तुझा रंग कसा, व्हॅक्युम क्लिनर, हसत खेळत, एक उनाड दिवस, मनोमिलन, लगीन घाई, इत्यादी १२ नाटकातून विविध भूमिका केल्या आहेत. चित्रपट सृष्टीची सुरुवात त्यांनी जानकी या चित्रपटातून १९६९साली केली. पुढे राम राम गंगाराम, पांडू हवालदार या दादा कोंडके यांच्या चित्रपटातून त्यांच्या भूमिका अत्यंत लक्षवेधी स्वरूपाच्या होत्या. हा कलाकार आपल्यापेक्षा चांगला अभिनय करतो हे लक्षात आल्यामुळे दादा कोंडके यांनी त्यांच्या नंतरच्या कोणत्याही चित्रपटात त्यांना भूमिका दिल्या नाहीत ही वस्तुस्थिती आहे.

### भूमिकांचे वैविध्य

अशोक सराफ यांना विनोदी अभिनेता असे प्रामुख्याने समजले जाते. तथापि त्यांनी सिनेमा, नाटक आणि काही मालिकातूनही गंभीर स्वरूपाच्या किंवा वेगळ्या पद्धतीच्या भूमिकाही केल्या आहेत. यशस्वी नटाने कोणत्याही एका प्रकारच्या भूमिकांमध्ये अडकू नये याचे भान राखून विविध प्रकारच्या भूमिका त्यांनी अतिशय सहजपणे निभावल्या आहेत.

संभाषणाचे अचूक टाइमिंग, योग्य पद्धतीने संवाद आणि भूमिकेला अनुसरून त्यात केलेला बदल हे सारे गुण एक समर्थ अभिनेता म्हणून अशोक सराफ यांच्यात आहेत, त्यामुळेच ममद्यापासून ते करण अर्जुन मधील वेगळ्या प्रकारच्या भूमिका ते सहजपणे निभावताना दिसून येतात.

हिंदी चित्रपटातही अतिशय सहजपणे ते वावरतात सिंघम, करण अर्जुन, येस बॉस, कोयला ,आ गले लग जा, मेरे बीवी की शादी, ही त्यांच्या हिंदी चित्रपटातील काही भूमिकांची नावे आहेत.

### माध्यमांवर पकड

नाटक, चित्रपट आणि टेलिव्हिजन वरील मालिका या प्रत्येक प्रकाराचे प्रारूप वेगळे आहे आणि यासाठी लागणारे कौशल्य देखील वेगळे आहे. अशोक सराफ यांचे वैशिष्ट्य म्हणजे सर्व प्रकारच्या माध्यमावर त्यांची जबरदस्त पकड आहे. त्यामुळेच नाटकात त्यांचा जेवढा सहज वावर असतो तेवढाच मालिकांमधूनही दिसतो, आणि चित्रपटातूनही!

माध्यमांच्या गरजेप्रमाणे स्वतःमध्ये बदल करणे हे त्यांना सहज शक्य होते, जे त्यांच्या समकालीन अनेक कलावंतांना अजूनही जमलेले नाही! त्यामुळे त्यांच्या कारकिर्दीमधील माध्यमांवरची पकड हा त्यांचा सर्वोत्तम गुण आहे असे मला वाटते. २५० हून अधिक हिंदी, मराठी चित्रपटातून त्यांनी वेगवेगळ्या प्रकारच्या भूमिका करून माध्यमा वरील आपली पकड सिद्ध करून दाखवली आहे.

### माणसांबद्दलचे प्रेम

कलावंत म्हणून अशोक सराफ जितके थोर आहेत, तितकेच व्यक्ती म्हणूनही!

त्यांच्या परिचयाच्या लोकां सोबत, सह कलावंतांसोबत आणि जुन्या सहकाऱ्यांसोबत त्यांचे अत्यंत जवळीकीचे संबंध आहेत. चित्रपटसृष्टी देण्याआधी जवळपास दहा वर्षे ते स्टेट बँकेत नोकरी करत होते. नाटकाच्या निमित्ताने दौऱ्यांच्या दरम्यान त्यांनी स्टेट बँकेत त्यांच्यासोबत असणाऱ्यांची आवर्जून भेट घेतली आहे असे समाज माध्यमातुन कळले आहे. त्यांना प्रेक्षकांबद्दल अत्यंत जिव्हाळा असून यशाचे दिवस हे प्रेक्षकांमुळेच आलेले आहेत असे त्यांनी प्रतिपादन केले आहे.

**पारितोषिके -** अशोक सराफ यांना अनेक पारितोषिके मिळालेली आहेत.

यामध्ये 'राम राम गंगाराम 'साठी सर्वोत्कृष्ट अभिनेता, 'गोंधळात गोंधळ' या चित्रपटासाठी सर्वोत्कृष्ट अभिनेता, 'गोष्ट धमाल नाम्याची' यासाठी सर्वोत्कृष्ट अभिनेता, तसेच फिल्मफेअर जीवनगौरव पुरस्कार, 'सवाई हवालदार' चित्रपटासाठी स्क्रीन अवॉर्ड, 'मायका बिटवा' या भोजपुरी चित्रपटासाठी पुरस्कार असे अनेक पुरस्कार त्यांना मिळाले आहेत.

महाराष्ट्र शासनाने त्यांना 'महाराष्ट्र भूषण' हा महाराष्ट्रातील सर्वात मोठा पुरस्कार देऊन त्यांचा यथार्थ गौरव केलेला आहे.

या गौरवा बद्दल त्यांचे मनःपूर्वक अभिनंदन! आणि उर्वरित आयुष्यात ते रसिकांचे या पद्धतीनेच मनोरंजन करत राहतील यासाठी शुभेच्छा.

**- डॉ. अभय मंडलिक**

# मुख्यमंत्री ईडीला किती काळ टाळू शकणार?

**लोकसभा** निवडणूक अवघ्या दोन महिन्यांवर येऊन ठेपली असताना झारखंडच्या मुख्यमंत्रीपदावर असलेल्या हेमंत सोरेन यांना ईडीच्या कोठडीत जावे लागले. मुख्यमंत्रीपदाच्या खुर्चीवर बसलेल्या नेत्याला थेट जेलमध्ये जावे लागले हे देशातील पहिलेच उदाहरण असावे. हेमंत सोरेन यांच्यावर ईडीने केलेली कारवाई योग्य की अयोग्य? हे न्यायालयात स्पष्ट होईल. हेमंत सोरेन यांच्यावर झालेली कारवाई राजकीय सूडबुद्धीने झाली का? याचे उत्तर मतदारच निवडणुकीत देतील. पण एका मुख्यमंत्र्याला पदावरून पायउतार होऊन थेट कोठडीत जावे लागले, हे मोठे दुर्दैव आहे. रांचीमध्ये सत्तेवर असलेल्या झारखंड मुक्ती मोर्चाच्या मुख्यमंत्र्यालाच जेलमध्ये जावे लागते हा फार मोठा धक्का आहे.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याकडे देशाच्या कारभाराची सूत्रे आल्यापासून ईडी, सीबीआय, आयकर विभाग अशा केंद्रीय तपास यंत्रणा तत्पर झाल्या हे वास्तव आहे. ज्यांनी भ्रष्टाचार केला, पैशाचे मोठे घोटाळे केले, मोठी बेहिशेबी मालमत्ता जमा केली, सरकारी पैशावर हात मारला आणि सत्तेच्या परिघात वर्षानुवर्षे राहून आपली घरे भरली व आपल्या परिवाराचेच कोटकल्याण केले, अशांना ईडी किंवा इन्कम टॅक्सच्या चौकशीने धडकी भरणे स्वाभाविक आहे. ईडीने समन्स पाठवल्यानंतरही चौकशीला सामोरे जायचेच नाही, असा अहंकार किंवा मग्रुरी दाखविणाऱ्या नेत्यांवर जेलमध्ये जाण्याची पाळी आज ना उद्या येणारच आहे. हेमंत सोरेन यांच्याबाबत नेमके तेच घडले.

ईडीची चौकशी होणार म्हणून काही वर्षांपूर्वी माजी मुख्यमंत्री व माजी केंद्रीय मंत्री शरद पवार यांचे नाव नुसते टीव्हीच्या पडद्यावर झळकले, तेव्हा ते स्वत:हून ईडीच्या मुंबईच्या कार्यालयात गेले होते, त्यांना ईडीने तेव्हा साधे बोलावलेही नव्हते. ईडीचे समन्स आल्यानंतर राजकारणी चौकशीला सामोरे जातात, कधी कधी वेळ मागून घेतात. मग हेमंत सोरेन व अरविंद केजरीवाल हे दोन मुख्यमंत्री ईडीचे समन्स टाळून काय मिळवत होते? हेमंत सोरेन यांना ईडीने तब्बल दहा वेळा समन्स पाठवले, तर अरविंद केजरीवाल यांना ईडीने पाच वेळा समन्स पाठवले. मुख्यमंत्रीपद हे राज्याचे सर्वोच्च अधिकाराचे घटनात्मक पद आहे. मग ईडीचे समन्स टाळून मुख्यमंत्री किती काळ पळ काढणार? एक मुख्यमंत्री आता जेलमध्ये गेला, आता दुसरे मुख्यमंत्री कशाची वाट पाहात आहेत? दिल्लीचे उपमुख्यमंत्री असलेले मनीष सिसोदिया गेल्या वर्षभरापासून ईडीच्या कारवाईनंतर जेलमध्ये आहेतच. तसेच आम आदमी पक्षाचे अन्य दोन मंत्रीही जेलची हवा खात आहेत.

ईडीचे समन्स आले असताना मुख्यमंत्री हेमंत सोरेन कुठे बेपत्ता होते, कुणाबरोबर होते, रांचीला परत कसे आले, त्यांनी राजशिष्टाचाराचे उल्लंघन केले काय? असा रांचीच्या उच्च न्यायालयात हेबिअस कोर्पस अॅड. राजीव कुमार यांनी दाखल केला आहे. हेमंत यांच्या दिल्लीच्या घरात ईडीला ३६ लाख रुपये मिळाले ते कोठून आले? असाही प्रश्न विचारला जात आहे. २७ जानेवारी २०२४ ला मुख्यमंत्री हेमंत सोरेन बेपत्ता झाले, २९ जानेवारीला ईडीचे पथक त्यांच्या दिल्लीतील घरी पोहोचले पण ते तेथे नव्हते. ३० जानेवारीला हेमंत रांचीमधील सरकारी निवासस्थानी प्रवेश करताना दिसले. ईडीने ८ ऑगस्ट २०२३ पासून २७ जानेवारी २०२४ पर्यंत हेमंत सोरेन यांना दहा वेळा समन्स पाठवली. बनावट कागदपत्रे करून शेकडो एकर जमिनीची सौदेबाजी केल्याचा त्याच्यावर आरोप आहे. या प्रकरणात अनेक अधिकारीही आरोपी आहेत. नगर परिषदेने या प्रकरणी एफआयआर नोंदवलेला आहे. रांची येथील तत्कालीन कमिशनर नितीन मदन कुलकर्णी यांच्यावर चौकशीची जबाबदारी सोपवण्यात आली होती. ईडीला अनेक पुरावेही प्राप्त झाले आहेत.

बिहारपासून आदिवासी प्रदेश वेगळा करून झारखंड हे स्वतंत्र राज्य असावे, या मागणीसाठी केलेल्या संघर्षातून झारखंड मुक्ती मोर्चाची स्थापना झाली. १९५० मध्ये झारखंडच्या निर्मितीच्या मागणीसाठी झारखंड फॉर्मेशन पार्टी लढा देत होतीच. आदिवासींची वेगळी ओळख आणि आदिवासी अस्मिता अशी तेथील जनतेला भावनिक साद घालत आंदोलने चालू होती. अविभाजित दक्षिण बिहारमधील आदिवासी व बिगर आदिवासी यांची ओळख झारखंडी अशी व्हावी, म्हणून झारखंड फॉर्मेशन पार्टी सर्वांमध्ये एकजूट करीत होती. या पक्षाने १९५२ मध्ये झालेल्या पहिल्या निवडणुकीत ३२ जागा जिंकल्या होत्या. नंतर राज्य पुनर्गठन आयोगाला स्वतंत्र राज्याच्या मागणीसाठी पत्रही दिले. पण आयोगाने ही मागणी तेव्हा फेटाळून लावल्यानंर या पक्षाची लोकप्रियता झपाट्याने घसरली. १९६३ मध्ये झारखंड फॉर्मेशन पार्टीचे काँग्रेसमध्ये विलीनीकरण करण्यात आले व त्यानंतर मतभेद व गटबाजीला उधाण आले. पुढे शिबू सोरेन यांच्या नेतृत्वाचा उदय झाला. त्यातून झारखंड मुक्ती मोर्चाकडे लोक आकर्षित झाले. शिबू सोरेन व बाबुलाल मरांडी या दोन नेत्यांत मतभेद झाल्याने झारखंड मुक्ती मोर्चाचेही नंतर विभाजन झाले. १९९७-९८ मध्ये झारखंड मुक्ती मोर्चाने लालू यादव यांच्या राजदला समर्थन दिले व तेव्हापासून झारखंड मुक्ती मोर्चाने निवडणुकीच्या राजकारणात राजदला बरोबर घेतले.

हेमंत सोरेन यांचे वारसदार म्हणून आलेले मुख्यमंत्री चंपई सोरेन हे कोणी शिबू सोरेन यांचे नातेवाईक नाहीत. पण पक्षाच्या स्थापनेपासून ते सक्रिय आहेत व शिबू यांचे निष्ठावान सहकारी आहेत. वयाने ६७ वर्षाचे चंपई सोरेन हे दहावी उत्तीर्ण आहेत. पण सहा वेळा आमदार म्हणून निवडून आले व तीन वेळा मंत्री झाले. त्यांच्या सरकारमध्ये काँग्रेस व राजद हे दोन्ही पक्ष सहभागी आहेत. शिबू सोरेन यांच्या बरोबरच्या झारखंडमधील प्रत्येक आंदोलनात चंपई सोरेन हे सक्रिय राहिले, म्हणूनच लोक त्यांना झारखंडचा टायगर म्हणतात. चंपई सोरेन हे शिबू यांना 'गुरुजी' म्हणतात. 'गुरुजी आमचे आदर्श आहेत, मी त्यांचा शिष्य आहे', असे ते अभिमानाने सांगतात.

चंपई सोरेन यांनी सरकार स्थापनेचा दावा करताना राज्यपालांना दिलेल्या पत्रावर विधानसभेतील ४३ आमदारांच्या स्वाक्षऱ्या आहेत. सरकारचे विधानसभेत बहुमत सिद्ध करण्यासाठी राज्यपालांनी त्यांना दहा दिवसांची मुदत दिली आहे. चंपई मुख्यमंत्री झाले असले तरी सोरेन परिवाराच्या हाती सत्तेचा रिमोट कंट्रोल राहील, अशी स्थिती आहे. अंगावर सैल शर्ट-पँट घालणाऱ्या व पायात चपला घालणाऱ्या चंपई यांची 'गुरुजींचा हनुमान' म्हणून दुसरी ओळख आहे. झारखंडच्या विधानसभेत ८१ आमदार आहेत. त्यात झारखंड मुक्ती मोर्चाचे २९, काँग्रेसचे १७, राजद १, सीपीआय एमएल १ अशी सत्तारूढ आघाडी आहे. विरोधी बाकांवर असलेल्या एनडीएमध्ये भाजपा २६, राष्ट्रवादी काँ. (एपी) १, एजेएसयू ३ व अपक्ष २ संख्याबळ आहे. विधानसभेत बहुमत सिद्ध करण्यासाठी ४१ हा जादुई आकडा आहे.

झारखंड राज्याची निर्मिती अटलबिहारी वाजपेयी पंतप्रधान असताना सन २००० मध्ये झाली. गेल्या २४ वर्षांत या राज्यात बारा मुख्यमंत्र्यांनी शपथ घेतली. पण भाजपाचे पहिले मुख्यमंत्री रघुबीर दास वगळता कोणालाही आपला कार्यकाळ पूर्ण करता आलेला नाही.

हेमंत सोरेन यांनी राजीनामा दिल्यानंतर चंपई सोरेन यांचे नाव उत्तराधिकारी म्हणून येताच अनेकांना आश्चर्याचा धक्का बसला. हेमंत यांची पत्नी कल्पना, त्यांची वहिनी सीता व भाऊ वसंत सोरेन हे तिघे मुख्यमंत्रीपदासाठी इच्छुक होते. सीता व अन्य पाच आमदारांनी पक्षाच्या विधिमंडळ पक्षाच्या बैठकीला गैरहजर राहून आपली नाराजी प्रकट केली होती. सीता यांनी म्हटले, 'हेमंत यांची पत्नी कल्पना यांना मी मुख्यमंत्री म्हणून मान्य करणार नाही. मीच का नेहमी त्याग करायचा? हेमंत मुख्यमंत्री झाले तेव्हा मी ते स्वीकरले, पण आता कल्पना मुख्यमंत्री होणार असेल तर ते मी मान्य करू शकत नाही...'

कल्पना मुर्मू-सोरेन याचे हेमंत यांच्याशी ७ फेब्रुवारी २००८ रोज लग्न झाले. त्या पंजाबमधील कपूरथाळा येथील आहेत. बीटेक, एमबीए त्यांचे शिक्षण आहे.

बाबुलाल मरांडी, अर्जुन मुंडा, शिबू सोरेन, मधू कोडा, रघुवर दास, हेमंत सोरेन, असे अनेक मुख्यमंत्री झारखंडला मिळाले. पण हे आदिवासी राज्य सतत भ्रष्टाचाराचे आरोप आणि राजकीय अस्थिरता या भोवऱ्यात सापडले आहे.

**- डॉ. सुकृत खांडेकर**

# लता दीदी संपूर्ण विश्वाची गानसम्राज्ञी

**स्वर्गीय** लता मंगेशकर यांनी गाण्याच्या ताकदीवर संपूर्ण विश्वाला जिंकले व भारताची मान उंचावली.त्याचा जन्म २८ सप्टेंबर १९२९ लाल इंदोर मध्यप्रदेश येथे झाला. वयाच्या ५ व्या वर्षांपासून गाणे गाण्याला सुरूवात केली व १३ व्या वर्षी लता दीदीने पहिले गाणे गाइले होते.दु:खाची बातमी म्हणजे लतादीदींच्या वयाच्या १३ व्या वर्षी वडिलांचे निधन झाले या संपूर्ण दु:खात राहुन त्यांनी मागे वळून कधीच पाहिले नाही व गाणं सम्राज्ञी बनली आणि त्यांच्या गाण्याने विश्वाचे संपूर्ण रेकॉर्ड तोडले.लता दीदीने आपल्या कारकीर्दीत तब्बल ३० हजार गाणे गायलेत तेही ३६ वेगवेगळ्या भाषांमध्ये.त्यांनी आपल्या गाण्याच्या माध्यमातून जनजागृती, समाजहित, मनोरंजनात्मक, संस्कृतीक, देशहित, भावनीक, देशभक्ती, धार्मिक अशा अनेक मिश्रणाने ३० हजार गाणे गायले व पार्श्वगायिका, संगीत निदेशक, निर्माताची मोठी भूमिका बजावली त्यामुळेच त्यांना आपण स्वर कोकिळा व गाणं सम्राज्ञी म्हणतो. १९६२ मध्ये चीन सोबत युद्ध संपल्यानंतर काही दिवसांतच २६ जानेवारी आली.२६ जानेवारी १९६३



ला 'हे मेरे वतन के लोगो' या गाण्याने संपूर्ण भारतीयांच्या डोळ्यात अश्रू आले व संपूर्ण भारत देशाला एकसुत्रीत ठेवण्यासाठी मोलाची भूमिका लता दीदीने बजावली. यावरून आपण समजू शकतो की त्यांच्या गाण्यात व आवाजात मोठी ताकद व दैवी शक्ती होती. त्याचप्रमाणे त्या साक्षात सरस्वतीचे रूप सुध्दा होत्या.परंतु ६ फेब्रुवारी २०२२ ला ९२ व्या वर्षी त्यांचे निधन झाले. हा दिवस फिल्म जगत, कला, साहित्य,संगीतजगत व सर्वांसाठी दु:खद ठरला व जनुकाय संगीत विश्वाचा अंत झाला की काय असे वाटायला लागले. लता दिदी कुटुंबात मोठी होती व संपूर्ण जीवन संघर्षमय रहाले.परंतु त्यांच्या गाण्याने संपूर्ण विश्व जिंकून गाणं सम्राज्ञी झाली. संघर्षमय जिवनात संगीताच्या फुलांनी नेहमीच त्यांचे स्वागत केले.आपण गाण्यातील चमकता तारा गमविला आहे.जोपर्यंत सुर्य-चंद्र, आकाश-पाताळ आहे तोपर्यंत त्यांचे नाव अमर राहील. आवाजाचे दुसरे नावच लता दीदी आहे.लता दीदींच्या गाण्यानेच फिल्म जगत शिखरावर पोहोचले.लता दीदींची संगीताची व गाण्याची प्रेरणा अनेक युगापर्यंत जीवीत राहिल. आज त्यांच्या पुण्यतिथी निमित्त संपूर्ण जग त्याचे स्मरण करीत आहे. लता दिदीला पुण्यतिथी निमित्त कोटी कोटी प्रणाम.जय हिंद.

**-रमेश कृष्णराव लांजेवार**

# विद्यार्थ्यांना बाल आनंदनगरीतून व्यवहारिकता व आर्थिक व्यवहाराचे ज्ञान



वैजापूर, दि. ५ (प्रतिनिधी) – शालेय स्तरावरील मुलां-मुलींना आनंदनगरी व बाल आनंद मेळाव्यातून वेगवेगळे स्टॉल वरील खाद्य पदार्थ विकून व्यवहारिक ज्ञानासोबत आर्थिक व्यवहार ही हाताळण्याचे ज्ञान मिळते जे त्यांच्या भविष्यात उपयुक्त ठरू शकेल, असे प्रतिपादन विद्याधन इंग्लिश माध्यमाच्या शाळेतील आनंदनगरी चे उदघाटन प्रसंगी माजी शिक्षणाधिकारी धोंडीरामसिंह राजपूत यांनी सोमवार(ता.०५) रोजी केले.

या आनंदनगरीत या शाळेच्या विद्यार्थ्यांनी तीस स्टॉल विविध खाद्य पदार्थाचे लावले होते, या प्रसंगी कृषी उत्पन्न बाजार समिती सदस्य तथा मर्चंट बँक संचालक प्रशांत त्रिभुवन, पत्रकार संघ अध्यक्ष भानुदास धामणे, सचिव किरणसिंह राजपूत, उपाध्यक्ष अशोक बोराडे, कोषाध्यक्ष रियाजुद्दीन शेख, या विद्यालयाच्या अध्यक्षा सौ. आशा गायके, सचिव दिगंबर गायके, प्राचार्या-भारती पाटील, पालक वर्ग, शिक्षक वर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# पाळीव प्राण्यांसाठी स्मशानभूमी आणि पार्क करण्यास प्रयत्नशील



छत्रपती संभाजीनगर, दि. ५ (प्रतिनिधी) – शहरात पाळीव प्राण्यांसाठी स्मशानभूमी आणि पार्क करण्यास प्रयत्नशील असल्याचे महानगरपालिकेचे आयुक्त तथा प्रशासक जी श्रीकांत यांनी सांगितले. ते मिशन रेबीज ऑर्गनायझेशन ऑफ इंडिया, छत्रपती संभाजी नगर महानगरपालिका व पशुसंवर्धन विभाग, महाराष्ट्र शासन यांच्या संयुक्त विद्यमाने महानगर पालिकेच्या प्रांगणात आयोजित रेबीज लसीकरण विशेष मोहिमेच्या उद्‌घाटनप्रसंगी ते बोलत होते.

यावेळी आयुक्त तथा प्रशासक जी. श्रीकांत,अतिरिक्त आयुक्त रणजित पाटील,उप आयुक्त नंदा गायकवाड,प्रादेशिक पशुसंवर्धन सह आयुक्त डॉ. संजय गायकवाड, जिल्हा पशुसंवर्धन उपायुक्त डॉ प्रदीप झोड, सहाय्यक आयुक्त पशुसंवर्धन विभागीय रोग अन्वेषण प्रयोगशाळा डॉ. रत्नाकर पेडगावकर, मुख्य उद्यान अधीक्षक विजय पाटील, प्र.पशू वैद्यकीय अधिकारी डॉ शेख शाहेद, कार्यकारी अभियंता अमोल कुलकर्णी, एम.बी. काझी, सहायक पशुधन विकास अधिकारी अनंत जाधव, रावसाहेब जावळे, होप संस्थेचे प्रवीण ओव्हळ,पशू वैद्यकीय महाविद्यालयाचे विद्यार्थी, मनपा कर्मचारी यांची प्रमुख उपस्थिती होती.

यावेळी उद्‌घाटनपर भाषणात आयुक्त म्हणाले की, मागील तीन वर्षांपासून शहरात श्वान दंश किंवा त्यापासून होणाऱ्या आजाराने एकही मृत्यू नाही. ही चांगली बाब आहे. आता शहर रेबीज मुक्त करण्यासाठी सर्वांच्या सहकार्याने लसीकरण मोहीम हाती घेण्यात आली आहे. या

## रेबीज लसीकरण मोहिमेस प्रारंभ

अंतर्गत शहरातील ३० हजार श्वानांचे लसीकरण करण्यात येणार आहे. इतक्या मोठ्या स्तरावर महाराष्ट्रात आपल्या शहरात ही मोहीम राबविली जात आहे. ज्यामुळे मानवी आरोग्य, पर्यावरण आणि प्राण्यांचे आरोग्य सुधारेल. त्याला शहरातील सर्व नागरिकांनी सहकार्य करावे, असे आवाहन त्यांनी केले.

तसेच शहरातील प्रत्येक कुटुंबाने एक श्वान दत्तक घेतल्यास शहरातील बऱ्याच मोठ्या प्रमाणावर मोकाट श्वानांची संख्या कमी होण्यास मदत होईल त्यामुळे मोकाट श्वान दत्तक घेण्याबद्दल आवाहन मा. प्रशासक महोदयांनी यावेळी केले.येत्या अर्थ संकल्पात पाळीव प्राण्यांसाठी पार्क, हॉस्टेल व स्मशान भूमी करणे करिता प्रस्ताव सादर करण्याच्या सूचना त्यांनी यावेळी पशू संवर्धन अधिकारी यांना केल्या.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक करताना प्रवीण ओहळ म्हणाले की, जगात प्रत्येक नऊ मिनिटाला एका व्यक्तीचा मृत्यू रेबीजने होतो. हे टाळण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजना म्हणून ही मोहीम राबविण्यात येत आहे.

**मोहिमेसाठी १०० जणांची टीम**

मिशन रेबीज अंतर्गत महानगरपालिकेच्या पुढाकाराने शहरात रेबीज लसीकरण विशेष मोहिमेला सुरुवात झाली आहे. यामध्ये ६० श्वान हाताळणारे आणि ४० डॉक्टरांचा समावेश आहे. यात १५ ऑटो रिक्षा व १० चारचाकी व्हॅन द्वारे पथक मोहीम राबविणार आहे.या मोहिमेसाठी उद्यान प्रमुख विजय पाटील, डॉ. शाहिद शेख, डॉ. रोहित धुमाळ आणि प्रवीण ओहळ यांनी पुढाकार घेतला आहे. मोहिमेच्या पहिल्या दिवशी टाऊन हॉल व बुडी लाईन परिसरात मोहीम राबविण्यात आली.सदर मोहीम दोन आठवडे राबविण्यात येणार आहे.यात मोकाट श्वान व पाळीव श्वान यांना रेबीज लसीकरण करण्यात येणार आहे.

यावेळी मान्यवरांच्या हस्ते दोन श्वानांना रेबीज लसीकरण करण्यात येऊन लसीकरण मोहिमेची सुरुवात करण्यात आली. अशी माहिती प्र.पशू वैद्यकीय अधिकारी डॉ शेख शाहेद यांनी दिली आहे.

# वैजापूर पत्रकार संघाच्या नवीन कार्यकारिणी पदाधिकाऱ्यांचा यशोधन इंग्लिश विद्यालयाने केला सत्कार




वैजापूर, दि. ५ (प्रतिनिधी) – वैजापूर शहरातील यावर्षीच्या पत्रकार संघाच्या नवीन कार्यकारिणीच्या पदाधिकारी व सदस्यांचा सत्कार यशोधन इंग्लिश विद्यालयाच्या वतीने सामाजिक बांधिलकी जपत सोमवार (ता.०५) रोजी करण्यात आला.

अध्यक्षा- सौ.आशा गायके, सचिव -दिगंबर गायके, कोषाध्यक्ष -शांतीलाल कोठाळे, प्राचार्या-भारती पाटील, व सर्व शिक्षक वृंद यांनी मराठी पत्रकार संघ अध्यक्ष-भानुदास धामणे, तसेच बाबासाहेब धुमाळ, उपाध्यक्ष-रियाजुद्दीन शेख, अशोक बोराडे, तसेच उपाध्यक्ष-मोबिनखान, सचिव -किरणसिंह राजपूत,सचिव फैसल पटेल व सदस्य सर्वश्री प्रशांत त्रिभुवन, सुनील त्रिभुवन, विजय गायकवाड, मन्सूरअली, अमोल राजपूत, मार्गदर्शक सल्लागार धोंडीरामसिंह राजपूत यांचा शाल व गुलाब पुष्प देऊन सत्कार केला. दरवर्षीच विद्याधन इंग्लिश विद्यालयच्या वतीने दिगंबर गायके आग्रहाने पत्रकारांना विद्यालयात बोलाऊन त्यांचा सत्कार व सन्मान करतात. लोकशाहीच्या चौथा आधार स्तंभ असलेल्या पत्रकारांचा विद्याधन इंग्लिश विद्यालयाने केलेला हा सत्कार अभिमान बाळगणारा आहे, असे प्रतिपादन माजी अध्यक्ष सुनील त्रिभुवन यांनी व्यक्त केले.

सूत्रसंचलन धोंडीरामसिंह राजपूत यांनी केले. आभार राहूल जाधव यांनी मानले.

# भर लग्नात जिल्ह्यातील राजकीय पुढारी एकमेकांशी भिडले, काही क्षणात बाजारपेठ बंद झाली

छत्रपती संभाजीनगर, दि. ५ (प्रतिनिधी) – ऐन लग्नातच राजकीय नेत्यांतील वाद उफाळून आल्याने वाळूज एमआयडीसीतील पंढरपूरमध्ये तणाव निर्माण झाला. दोन्ही गट आमनेसामने आले होते. पोलिसांनी वेळीच मध्यस्थी करून परिस्थितीवर नियंत्रण मिळवले. लग्नाला खासदार इम्तियाज जलीलही आले होते. लग्नात राडा झाल्याचे पाहून त्यांनी तिथून काढता पाय घेतला. वाहतूक कोंडीमुळे रॉंग साइड गाडी काढून शहरात निघून आले. ही घटना रविवारी (४ फेब्रुवारी) दुपारी सव्वाच्या सुमारास घडली.

**नक्की काय झाले?**

सामाजिक कार्यकर्ते निसार शेख यांच्या मुलीचे लग्न पंढरपूरमध्ये होते. लग्नाला माजी जिल्हा परिषद सदस्य रमेश गायकवाड आणि पंढरपूर ग्रामपंचायतीचे सदस्य आमेर खान पठाणही आले होते. पूर्ववैमनस्यातून त्यांच्यात लग्नातच शाब्दिक चकमक उडाली. ही बाब त?यांच्या समर्थकांना कळताच त्यांनीही लग्नस्थळी धाव घेतली. दोन्हीकडील जमाव एकमेकांवर चाल करून येणार तोपर्यंत पोलीसही घटनास?थळी आले होते. त?यांनी दोन्ही गटांना आवरून रमेश गायकवाड व आमेर पठाण यांना वाळूज एमआयडीसी पोलीस ठाण्यात आणले. वरिष्ठ पोलिस निरीक्षक अविनाश आघाव यांनी दोघांची समजूत काढली. त्यानंतर गायकवाड व पठाण यांनी गावात जाऊन त्यांच्या समर्थकांना शांततेचे आवाहन केले.

**काही मिनिटांत बाजारपेठ बंद...**

दोन गट आमने-सामने आल्याने तणाव निर्माण झाला होता. राडा होणार असल्याचे कळताच परिसरातील व्यापारी, व्यावसायिकांनी तत्काळ दुकाने बंद केली. तोपर्यंत स?थानिक पोलिसांनी शहरातून दंगल नियंत्रण पोलिसांनाही बोलावले होते. यामुळे पंढरपूरला छावणीचे स्वरूप आले होते. सायंकाळी दैनंदिन व्यवसाय सुरळीत झाले. विवाह समारंभाला विविध पक्ष, संघटनांचे पदाधिकारी आणि प्रतिष्ठित नागरिक उपस्थित होते. प्रतिष्ठित नागरिकांचा शेख परिवाराने सत्कारही केला. गायकवाड आणि पठाण यांच्यात विवाहस्थळाच्या प्रवेशद्वारावरच ठिणगी उडाली होती. त्यानंतर मोठ्या संख्येने चौका-चौकात नागरिक रस्त्यावर उतरले होते. रमेश गायकवाड यांचे शहरातील कार्यकर्ते एमआयडीसी वाळूज पोलीस ठाणे परिसरातही जमले होते. रमेश गायकवाड हे शिवसेना आमदार संजय शिरसाट यांचे कट्टर विरोधक म्हणून देखील ओळखले जातात.

# विज्ञान प्रदर्शनात विद्यार्थ्यांनी सादर केले नवं-नवे प्रकल्प



वैजापूर, दि. ५ (प्रतिनिधी) – आजचे युग हे ज्ञान, विज्ञान, तंत्रज्ञान व नवं नव्या वैज्ञानिक यंत्रांचे युग आहे. आजचा विद्यार्थी ही या बाबत अत्यंत चौकस व प्रगत वैज्ञानिक विचारांचा आहे.

यात शालेय विद्यार्थी ही मागे नाहीत, याची चुनक येथील यशोधन इंग्लिश माध्यमाच्या विद्यार्थ्यांनी नवं -नवे प्रयोग आपल्या विज्ञान प्रदर्शनातून दाखवून सर्वांना प्रभावीत केले,या प्रदर्शनाचे उदघाटन कृषी उत्पन्न बाजार समिती मर्चंट बँक संचालक प्रशांत त्रिभुवन व पत्रकार सुनील त्रिभुवन यांनी केले.

या विद्यालयाचे विद्यार्थी धीरज मापारी, आदिती पवार, प्रज्ञा त्रिभुवन, भक्ती जगताप, कैवल्य निर्मळ, ऋतुजा जगताप यांनी आपल्या ज्ञान व कौशल्याच्या आधारे विविध प्रकल्प सादर करून सर्वांना थक्क केले.

या प्रसंगी अध्यक्षा आशा गायके, सचिव दिगंबर गायके, माजी शिक्षणाधिकारी धोंडीरामसिंह राजपूत, भानुदास धामणे, किरणसिंह राजपूत, रियाजुद्दीन शेख, अशोक बोराडे यांनी विद्यार्थ्यांचे प्रकल्प पाहून त्यांना शाबासकी दिली.

शिक्षक सर्वश्री मोहिनी मापारी, पूनम भागवत, पंकज पारखे, गौरी थोरे, विद्या शेलार, श्रद्धा कासार, साईनाथ शिंदे, निलेश अंभोरे, तुषार तुपे, रोहिणी आहेर, आरती कानडे यांनी सहभाग नोंदविला, विज्ञान प्रदर्शन आयोजिका पूनम भागवत यांनी सर्व पाहुण्यांचे आभार मानले.

# इच्छामरणावर भाष्य करणारा 'आता वेळ झाली'

**अनंत** नारायण महादेवन दिग्दर्शित, लिखित 'आता वेळ झाली' या चित्रपटाचे पोस्टर नुकतेच सोशल मीडियावर झळकले असून पोस्टरमध्ये दिलीप प्रभावळकर आणि रोहिणी हट्टंगडी दिसत आहेत. या चित्रपटाची घोषणा अभिनेते प्रतीक गांधी यांनी आपल्या सोशल मीडियावरुन केली आहे.

सत्य घटनेवर आधारित या चित्रपटाच्या नावातच अवर ग्लास दिसतोय आणि त्यातून सरत चाललेली वेळही दिसतेय. 'इफ यू वॉंट अ हॅप्पी एण्डिंग, यू मस्ट नो व्हेअर टू एण्ड युअर स्टोरी' अशी या चित्रपटाची टॅगलाईन आहे. दिलीप प्रभावळकर, रोहिणी हट्टंगडी यांच्यासह या चित्रपटात भरत दाभोळकर, सुरेश विश्वकर्मा, स्मिता तांबे, जयंत वाडकर, अभिनव पाटेकर यांच्या प्रमुख भूमिका आहेत.



इमेजीन एंटरटेन्मेंट अँड मीडिया, अनंत नारायण महादेवन फिल्म्स यांच्या सहयोगाने 'आता वेळ झाली' या चित्रपटाचे दिनेश बंसल, जी. के. अग्रवाल आणि अनंत महादेवन निर्माते आहेत.

चित्रपटाबद्दल अनंत नारायण महादेवन म्हणतात,' जीवनाचा शेवट आनंदी व्हावा, असे वाटणाऱ्या प्रत्येक वयस्काच्या अस्तित्वाची गोष्ट सांगणारा हा चित्रपट आहे. हा चित्रपट म्हणजे हृषिकेश मुखर्जींच्या 'आनंद'ची दुसरी बाजू आहे.

इच्छामरण हा एक असा विषय आहे, ज्याने या महामारीच्या काळात मला प्रभावित केले. जेव्हा जगाने जीवन आणि मृत्यूकडे एका वेगळ्या नजरेने पाहाण्यास सुरूवात केली. तरुणाईचाही जीवनाकडे पाहाण्याचा दृष्टीकोन बदलला. भौतिकवादी दृष्टीकोनापेक्षा व्यावहारिक दृष्टीकोनाकडे त्यांचा कल वाढला.

हा चित्रपट पाहून वृद्धांच्या मनातील घालमेल तरूणाईला नक्कीच कळेल.'' असे महादेवन यांनी सांगितले. काहीशा वेगळ्या विषयावरील या चित्रपटाने आतापर्यंत अनेक राष्ट्रीय तसेच आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवात पुरस्कार प्राप्त केले आहेत.

# वेरूळ-अजिंठा महोत्सवाची नियमितता राखण्यासाठी कटीबद्ध-गृहनिर्माण मंत्री अतुल सावे




छत्रपती संभाजीनगर दि. ४ (प्रतिनिधी)- वेरूळ -अजिंठा महोत्सवाचे या वर्षी पुनरागमन झाले. यानंतर त्यात खंड न पडता दरवर्षी नियमित आयोजन करण्यासाठी कटीबद्ध राहू, असे आश्वासन राज्याचे गृहनिर्माण, इतर मागास कल्याण मंत्री अतुल सावे यांनी दिले.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ परिसरातील सोनेरी महल परिसरात आयोजित वेरूळ अजिंठा महोत्सवाची आज सांगता झाली.

सांगता सोहळ्यास खासदार इम्तियाज जलील, विभागीय आयुक्त मधुकर राजे आर्दड, सेवा हमी आयुक्त दिलीप शिंदे,मनपा आयुक्त जी. श्रीकांत,नांदेडचे जिल्हाधिकारी अभिजित राऊत, जालना जिल्हाधिकारी श्रीकृष्ण पांचाळ,धुळे जिल्हाधिकारी अभिनव गोयल, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी विकास मीना, जालना जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी वर्षा मीना,पोलीस आयुक्त मनोज लोहिया,पोलीस अधीक्षक मनीष कलवनिया,मोक्षदा पाटील, पर्यटन उपसंचालक विजय जाधव यांची उपस्थिती होती. खा. इम्तियाज जलील यांनी वेरूळ महोत्सवात काही वर्षांपूर्वी निवेदक म्हणून सहभाग घेतल्याच्या आठवणीला उजाळा दिला. विभागीय आयुक्त मधुकर राजे आर्दड यांनी महोत्सवाचे आयोजन उत्तम केले याबद्दल सर्व सहभागी शासकीय यंत्रणांचे अभिनंदन केले तसेच सर्व नागरिक, रसिक यांनी या महोत्सवात सहभागी होऊन आनंद घेतला याबद्दल आभार मानले.

पर्यटन सदिच्छा दूत नवेली देशमुख यांनी राज्यातील पर्यटन कला आणि संस्कृती जागतिक पातळीवर नेण्यासाठी महाराष्ट्र नेहमीच अग्रेसर आहे, असे मनोगत व्यक्त करताना सांगितले.



# उत्कृष्ट कार्य करणाऱ्या आशा वर्कर्स चा गुण गौरव

वैजापूर ता. ५ (प्रतिनिधी) – तालुक्यातील आशा वर्कर्स यांनी आपल्या सामाजिक बांधिलकीच्या कर्तव्यातून माता बाल संगोपन,गरोदर मातांचे लसीकरण, बाळ जन्मल्यापासून पांच वर्ष चे होईपर्यंत त्यांची व्यवस्थित देखभाल केल्याने बाळ मृत्यू दर व माता मृत्यू दर कमी झाला. तसेच ग्रामीण भागात आयुष्यामान भारत कार्ड मिळवून देण्यात उत्कृष्ट कर्तव्य पार पाडले त्या आशा वर्कर्स चा जिल्हा आरोग्य समिती सदस्य तथा माजी शिक्षणाधिकारी धोंडीरामसिंह राजपूत यांच्या हस्ते प्रशस्तीपत्र, गुलाब पुष्प देऊन नुकताच गुणगौरव करण्यात आला. तालुका आरोग्य अधिकारी डॉ. गुरुनाथ इंदूरकर यांची या समयी प्रमुख उपस्थिती होती.

# लोकनेते स्व. आर.एम. वाणी यांचा ही पूर्णाकृती पुतळा महाराष्ट्र बँकेच्या दक्षिण बाजूला बसवा



वैजापूर ता. ५ (प्रतिनिधी) – तालुक्याचे लोकनेते, दीन, दुबळे व गोर, गरिबांचे कैवारी, दिव्यांगांचे दाते व नांदूर मध्यमेश्वर कालव्यासाठी झटून हा कालवा पूर्णत्वास नेणारे माजी आमदार कै. आर.एम. वाणी यांचा पूर्णाकृती पुतळा नगरपालिका हद्दीत बसवा अशी मागणी करणारे निवेदन प्रहार संघटनेच्या वतीने सोमवार (ता.०५)रोजी नगरपालिकेचे प्रशासक तथा मुख्याधिकारी भागवत बिघोत (राजपूत) याना देण्यात आले. लोकनेते कै. आर.एम. वाणी यांचा पुतळा महाराष्ट्र बँक शाखा वैजापूर जवळील रिकाम्या जागी पालिकच्या हद्दीत बसवा अशी मागणी होती. याची आठवण सामाजिक कार्यकर्ते धोंडीरामसिंह राजपूत यांनी मुख्याधिकारी याना करून दिली जेणे करून समोर पं.स. कार्यालय ला नाव स्व. आर.एम. वाणी यांचे दिले आहे व समोरच पुतळा हे संयुक्तिक होईल व स्व. वाणी यांचा आदर्श सर्व शहर समोर राहील, यावर भागवत बिघोत यांनी पुतळा महाराष्ट्र बँकेसमोर दक्षिण दिशेला डीपी दुसऱ्या ठिकाणी हलवून पुतळा स्थापन केला जाईल, असे अश्वासन दिले. या समयी प्रहारचे तालुका अध्यक्ष गणेश आप्पासाहेब सावंत, उपाध्यक्ष विशाल शिंदे, देवनाथ ठोंबरे, शिवसेना तालुका प्रमुख राजेंद्र पा. साळुंके, शिवसेना शहर प्रमुख पारस घाटे, सामाजिक कार्यकर्ते धोंडीरामसिंह राजपूत, प्रहारच्या महिला शहर प्रमुख पूनम पठारे, लोणी सर्कल प्रमुख शबाना शेख, रामचंद्र पिलदे यांच्यासह प्रहारचे सदस्य यांची उपस्थिती होती.

सोमवार खेरीज दररोज प्रसिद्ध होणारे दैनिक
लोकविजय
(आरएनआय रजि. नं. ११४२१/६१)
हे पत्रक मुद्रक, प्रकाशक श्री. राजेंद्र पांडुरंग रांजणीकर यांनी सोलापूर तरूणभारत मिडिया लिमिटेड, रेल्वेस्टेशन एमआयडीसी स्टेशनरोड औरंगाबाद येथे छापून दैनिक लोकविजय कार्यालय, ३, चेतनानगर, (माणिक आर्केडच्या पाठीमागे,) औरंगाबाद येथे प्रसिद्ध केले.
: संपादक :
राजेंद्र पांडुरंग रांजणीकर
मो. :९३२५२११९०१, ९५१८७६६३९५
e-mail:lokvijay2000@yahoo.co.in

या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या, फीचर, लेख, कथा यांच्या मताशी संपादक सहमत असतीलच असे नाही.
बातम्या व इतर मजकूराबद्दल काही वाद निर्माण झाल्यास त्याची सर्व जबाबदारी संबंधीत वार्ताहार, प्रतिनिधी, उपसंपादक, वृत्तसंपादक, यांची राहील. संपादक, मालक, प्रकाशक, मुद्रक त्याला जबाबदार राहणार नाहीत.
(औरंगाबाद न्यायकक्षेत)

